महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६६ /२०२२ दि. २६/०८/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे शहरात कोपरी वाहतुक उप विभागाचे हददीत दि.०५/०९/२०२२ (गौरी व गणपती विसर्जन) व दि. ०९/०९/२०२२ (अनंत चतुर्दशी) या गणेशमुर्ती विसर्जनाचे दिवशी कोपरी सर्कल कडुन ठाणे स्टेशन पुर्व हसिजा कॉर्नर–आनंद सिनेमा–सिमला ज्युस सेंटर–टि.एम.टी.स्टॅन्ड ते अष्टविनायक चौका कडुन गणेश घाट मिठबंदर येथे विसर्जनासाठी जात असतात नमुद मार्गावरील रस्ता अरुंद असल्याने तसेच गोखले रोड नौपाडा येथील टेलीफोन नाका ते हायमास–गावेदवी मंदिराकडुन तलावपाळी विसर्जन घाटाकडे जाणारे मिरवणुकांचे मार्गावर मोठया प्रमाणात जनसमुदाय उपस्थित राहतो. नमुद परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१ अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद–** कोपरी सर्कल–हासिजा कॉर्नर–आनंद सिनेमा–कोपरी रेल्वे स्टेशन मार्गाकडे जाणा–या टि.एम.टी.,बेस्ट,वसई विरार मनपा या परिवहन उपक्रमाच्या बसेस, इतर बसेस व अवजड वाहनांना कोपरी सर्कल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने हि कोपरी सर्कल येथे प्रवाशी उतरवुन तेथुन वळण घेवुन परत इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग–** कोपरी सर्कल ते गोकुळधाम सोसायटी पर्यत कंपनी व इतर खाजगी बसेस तसेच अवजड वाहनांना दोन्ही बाजुस पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**नो पार्किंग–** गोखले रोड येथे दुचाकी व चार चाकी वाहनांना पी–१,पी–२ प्रमाणे पार्कींग देण्यात आली असुन इतर ठिकाणी दुचाकी व चारचाकी वाहनांना पार्कींग करीता मनाई करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक अधिसचुना ही दि.०५/०९/२०२२ (गौरी व गणपती विसर्जन) व दि.०९/०९/२०२२ (अनंत चतुर्दशी) या कालावधीत दुपारी १५.०० वा. पासून गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपर्यत अंमलात राहिल. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

CamScanner

परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका,ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रतः– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/वागळे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner